Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास

**श्री. शिवराज कल्याणराव लाखे**
संशोधक विद्यार्थी

**प्रा.डॉ.संभाजी रा. वारुंगळे पाटील**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे,
अंकुशराव टोपे महाविद्यालय,जालना.

**प्रस्तावना :-**

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेस प्राचीन व गौरवाशाली इतिहास लाभलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे वर्गीकरण प्रामुख्याने शहरी व ग्रामीण अशा दोन भागात केले जाते. ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेस पंचायतराज या नावाने देखील ओळखले जाते. पंचायतीच्या रुपाने अस्तित्वात असलेल्या या संस्था प्राचीन काळात सक्षम व स्वंयपूर्ण होत्या. म्हणून प्राचीन कालखंडास बऱ्याच विचारवंतांनी पंचायतीचे सुवर्णयुग असे म्हटले होते. मध्ययुगीन कालखंडात या संस्थाच्या कार्यात विशेष हस्तक्षेप झाल्याचे दिसून येत नाही. विशेषत: मोगल राजवटीच्या काळात शहरी व्यवस्थापनावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आल्यामुळे या संस्थेस लाभलेली प्राचीन व गौरवशाली परंपरा मध्ययुगीन कालखंडात काही प्रमाणात प्रयत्न केला गेला. तरी देखील स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेची संघटन व कार्यपध्दती मुख्य:ब्रिटिश शासनाची देणगी म्हणता येईल. पुढे ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीचे खऱ्या अर्थाने या संस्थाच्या एकूण कार्यप्रणालीमध्ये आमुलाग्र बदल झल्याचे सांगता येईल. आजच्या आधुनिक काळात या संस्था ग्रामीण विकासामध्ये महत्त्वाची भुमिका पार पाडतांना दिसून येतात.

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

१. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ऐतिहासिक पार्श्वभुमीचा आढावा घेणे.
२. स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण विकास या संकल्पनाचा अर्थ जाणून घेणे.
३. ग्रामीण विकासातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या भुमिकेचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :-**

१. प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थेस गौरवशाली परंपरा लाभलेली आहे.
२. ग्रामीण विकासामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे दिसून येते.

**तथ्य संकलन :-**

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम आधार साम्रगीचा वापर केला ग्रला आहे. यासाठी संदर्भग्रंथे, वर्तमानपत्रे, इंटरनेट व मासिके इ.चा वापर केला गेला आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्था : ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

स्थानिक स्वराज्य संस्थेचा ऐतिहासिक आढावा घेत असतांना खालील चार टप्प्यांचा आधार घेऊन आपणांस तो जाणुन घेता येईल.

**१. प्राचीन भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था :-**

प्राचीन काळापासून भारतामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात असल्याचे पुरावे मिळतात. या संस्थेस प्राचीन काळात पंचायतीच्या रुपाने अस्तित्वात होत्या. सर्व बाबतीत स्वयंपुर्ण व सक्षम असलेल्या या संस्था कोणत्याही परकीय नियंत्रणापासून मुक्त असल्याचे आपणांस सांगता येईल. पंचायतचे आदर्श प्रारुप प्राचीन काळात भारतामध्ये असल्याचे दिसून येते. अतिप्राचीन कालखंडामध्ये भाषा व संस्कृतीचा विकास प्राथमिक अवस्थेत होता. यामध्ये पाषाण युगातील समुदायाचा समावेश होऊ शकतो. या काळात या संस्थांचे विशेष संदर्भ जरी उपलब्ध नसले तरी टोळयांनी राहणारी मानवी वस्ती व त्यांचा प्रमुख

हेच पंचायतीचे प्रांरभिक स्वरुप होते असे मानले जाते. मध्य प्राचीन कालखंडामध्ये पंचायतीच्या संबधाने अस्पष्ट का असेना काहीसे पुरावे उपलब्ध होतात. यात प्रमुखाने वैदिक काळाचा समावेश होतो. या वेदांमध्ये, ग्रामसभा, रामायणात जनपदसंघ, महाभारत ग्रामसभा व तेथील प्रमुखास ग्रामिणी म्हणत असल्याचा उल्लेख आढळतो. मनुस्मृती व नारदस्मृतीमध्ये गाव तेथे पंचायतीचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. तसेच बध्दकालीन जातक कथांवरुनही स्वंयपुर्ण गाव व पंचायतीच्या रचनेचा उल्लेख आढळतो. या काळात गावाच्या प्रमुखास ग्रामसंयोजक नावांने ओळखले जाते. शांत्रीपर्वातही ग्राम हा शासनाचा सर्वात लहान व प्रमुख घटक असल्याचे म्हटले जाते.

उत्तर प्राचीन कालखंडामध्ये बरेचशे पुरावे साहित्य व शिलालेखाच्या रुपाने उपलब्ध आहेत. यात प्रामुख्याने मौर्य, चोल व गुप्त राज्याच्या काळामध्ये उत्कृष्ट पंचायतींची व्यवस्था असल्याचे पुरावे मिळतात. कौटिल्याचे अर्थशास्त्र व मॅगेरस्थनिसचे इंडिया व प्राचीन ग्रंथातुन मौर्य काळात पंचस्तरीय ग्रामीण व्यवस्था यामध्ये स्थानिक द्रोगमुख, खार्वटिक, संग्रहण व ग्राम अशी व्यवस्था अस्तित्वात असल्याचे दिसते. विशाखादत्तच्या मुद्राराक्षस या नाटकासही मौर्य कालीन स्थानिक स्वशासनाचा उल्लेख आढळतो. प्राचीन भारतातील गुप्त व चोल राजाच्या काळातही पंचायतीची उत्कृष्ट रचना केलेली होती. म्हणून या कालखंडास तयार होत असे व या पंचायतीच्या प्रमुखांस ग्रामिणी, ग्रामिका, गोपा असे वेगवेगळया नावाने वेगवेगळया काळात संबोधले जात असे. या प्राचीन काळातील पंचायतेस प्रामुख्याने न्यानिवडा, कृषी विकास, वनसंवर्धन, नैसर्गिक आपत्ती पासुन नागरिकांचा बचाव करणे, मंदीर व धार्मिक स्थळाचे व्यवस्थापन, मनोरंजन व ग्रामसंरक्षरण इ. विविध कार्य पार पाडावी लागत असे.

**२. मध्ययुगीन कालखंडातील स्थानिक स्वराज्य संस्था :-**

मध्ययुगीन कालखंडास साम्राज्यवादी कालखंड म्हणून ओळखले जाते. या संदर्भात प्रामुख्याने भारतातील मोगल राजवटीचा समावेश होतो. या काळातील शेरशाह सुरीच्या स्थानिक शासनाचा सर्वात लहान घटक गाव असे व गावाच्या प्रमुखांस मुखिया किंवा मुकादम असे म्हटले जाते असे पटवारी गावाचा हिशोब पाहत असे संपुर्ण मोगल प्रांत अनेक सरकार व जिल्हयामध्ये विभागलेला होता. यातील सर्वात लहान शाखा परगनाड होती. काजी. मुफती व मीर अदिल नावाचे न्यायीक कार्ये पार पाडत असे. अकबराच्या काळात ग्रामपंचायतीतील वैधानिक रुपात न्याय देणारी संस्था म्हणून स्विकृती होती. सामान्यपणे या काळात राज्याची विभागणी प्रांतात केली जात असे. ज्यावर अमीर नावाचा अधिकारी कार्यरत असे. प्रांताची विभागणी घशिकड मध्ये केली जात तेथे घशिकदारड नावाचा अधिकारी असे तसेच आजच्या जिल्हयासारखा भाग म्हणजे परगणा तेथे अंमलगुजार असे अधिकारी कार्यरत होते. तत्कालीन गावांना मोगा व मौजा असे संबोधले जात असे. न्यायदानासाठी चौधरी हा अधिकारी कार्य पाहत असे. महाराष्ट्रामध्ये शिवाजी महाराजांच्या काळात पंचायतींना अधिक सक्षम बनवण्यात आले होते. पंचायती जनतेच्या सोयीच्या वाटल्याने महाराजांनी त्यांना आश्रय दिला. गावातील वाद संघर्ष यांच्या निर्णयासाठी जनतेला कुठेही लांब जावे लागु नये त्यांचा न्याय तेथे वस्तुस्थिती प्रत्यक्ष डोळयांनी पाहणाऱ्या पंचानी करावा असे त्यांचे धोरण होते.

**३. ब्रिटीश कालखंडातील स्थानिक स्वराज्य संस्था :-**

ब्रिटीश हे लोकशाहीचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी भारतात स्थानिक स्वशासनासंबंधी निर्णय घेतांना केवळ प्रशासकीय सुविधाच नजरेसमोर ठेवली. ब्रिटिशांनी भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेशी संबंधी घेतलेला पहिला महत्वपुर्ण निर्णय म्हणजे १६८७ साली मद्रास येथील महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली. पुढे इ.स. १८७० ला लॉर्ड मेयो यांनी स्थानिक संस्थावरील वित्तीय जबाबदारीत वाढ करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीशांनी जनहितापेक्षा साम्राज्यवादी दृष्टिकोण समोर ठेवून वरील संस्थांची निर्मिती केल्याचे आपणांस सांगता येईल. यानंतर १८८२ साली लॉर्ड रिपन यांनी आपला प्रसिध्द स्थानिक स्वशासनाचा ठराव मांडला. ज्या मध्ये अधिकार व वित्तीय उपलब्धतेच्या दृष्टिने स्थानिक स्वशासन संस्थानासाठी विशेष सुविधांची तरतुद करण्यात आली होती. रिपनच्या या ठरावा मुळेच त्याला आधुनिक भारतीय स्वशासनाचा जनक म्हणून संबोधले जाते. यानंतर इ.स.१९१६ मध्ये चेम्सफोर्ड प्रस्ताव स्थानिक शासनाच्या अधिकार

वृध्दीसाठी महत्वाची पायरी मानली जाते. अर्थातच या काळात स्थानिक स्वशासनाच्या विकासाचे बरेच प्रयत्य झाल्याचे दिसतात.

परंतु या मागचा उद्देश विकासापेक्षा प्रशासकीय सुविधा हाच होता. इ.स. १९२० साली मुंबई ग्रामपंचायत अधिनियम तयार करण्यात आला व या कायद्याने मुंबई ग्रामपंचायतींना वैधानिक दर्जा प्राप्त झाला. यानंतर पुढे भारत सरकार अधिनियम १९३५ तयार करण्यात आला व या अधिनियामानुसार भारतात सुधारित राज्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला. स्थानिक स्वशासनाची जबाबदारी प्रांतावरच सोपविण्यात आली. थोडक्यात ब्रिटिश कालखंडात भारतातील पारंपारिक स्थानिक स्वराज्य संस्थेचा ऱ्हास होऊन ब्रिटिशांस अनुकूल अशा व्यवस्थेचा स्विकार केला गेला. विशेषत: ब्रिटिशकालीन प्रयत्न हे प्रशासकीय सुविधेच्या दृष्टिकोनातुन असले तरी आधुनिक भारतीय स्वशासनाची मुहूर्तमेढ याच कालखंडात रोवली गेली.

**४. स्वांतत्र्योत्तर कालखंडातील स्थानिक स्वराज्य संस्था :-**

भारताला स्वंतत्र्य प्राप्त झाल्यानंतर महात्मा गांधीजींनी खरा भारत हा खेडयात आहे. असा संदेश दिला. ग्रामिण विकास साधण्यासाठी भारतसरकारने सामुदायिक विकास कार्यक्रमाची घोषणा केली. परंतू या कार्यक्रमाला पाहिजे तसा प्रतिसाद ग्रामीण जनतेतुन मिळाला नाही. म्हणूनच या कार्यक्रमाला साहाय्यभुत अशा राष्ट्रीय विस्तार सेवा या समांतर कार्यक्रमाची आखली करण्यात आली. हा कार्यक्रम देखील अपयशी ठरला. या दोन्ही. कार्यक्रमाच्या अपयशांच्या पार्श्वभुमिवर शासनाने पाच वर्षांच्या आतच या कार्यक्रमाचा पुर्नविचार करण्यास सुरुवार केली. या कार्यक्रमांच्या अपयशाची कारणे शोधण्यासाठी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. व या समितीच्या शिफारशीचा परिणाम म्हणजे भारतात त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली. या समितीच्या शिफारशींच्या आधारावरच भारतातील अनेक राज्यांत पंचायत राज व्यवस्था सुरु करण्यात आली. यानंतर अशोक मेहता समिती यानंतर अशोक मेहता समिती (१९७७) श्री.जी.व्ही. के.रव समिती (१९८५) डॉ. एम.एल.सिंघवी समिती (१९८६) अशा विविध समित्यांच्या शिफारशींच्या आधारावर भारतातील या संस्थाचा विकास होवु लागला. परंतु भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एकूणच सरंचना कार्यप्रणाली मध्ये आमुलाग्र बदल ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने घडवुन आणला. या संस्थाना कायदेशीर मान्यता मिळाली व आज घडीला या संस्था संपुर्ण भारतभर ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी कार्य करतांना दिसून येतात.

महाराष्ट्र सरकारने देखील यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासनाने वसंतराव नाईक यांया अध्यक्षतेखाली समिती (१९६०) नेमली व या समितीच्या अहवालाला अनुसरुन महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेचा विकास झाल्याचे आपणांस सांगता येईल. यानंतर ल.नं.बोंगीरवार समिती १९७० पी.बी. पाटिल समिती १९८४ या समित्यांनी देखील या संस्थांच्या विकासाला चढउतार पाहिले आहे. व या सर्व घटकांच्या परिणामातुन आजची स्थानिक स्वराज्य संस्था उभी राहीलेली आहे. व भविष्यात देखील या संस्थांचा विकास व वाटचाल कालानुरुप होत राहणार आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्था : संकल्पना व अर्थ :-**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अनेक व्याख्या विविध अभ्यासकांनी आपणांस केल्याचे दिसुन येते. त्या खालील प्रमाणे सांगता येईल.

सर आयवर जेनिंग यांच्या मते, "सर्वसाधारण भाषेत स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ स्थानिक पातळीवरील शासन नाही. स्थानिक शासन आपल्यापेक्षा वरीष्ठ शासनास जबाबदार असते."

"गोल्डींग यांच्या मते, "स्थानिक लोकांनी स्वत:त्यांच्या प्रश्नांची व्यवस्था करणे म्हणजे स्थानिक शासन होय."

जी.डी.एच.कौल. यांच्या मते, "स्थानिक शासनाचे कार्यक्षेत्र लहान असते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना सोपविलेले कार्य ते करतात. सार्वभौम नसतात ते कायदे करीत नसतात. वरिष्ठ संस्थांनी तयार केलेल्या कायद्यांची ते अमंलबजावणी करतात.

डब्ल्यु इ.जॅक्सन च्या मते, "स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे विशिष्ट भागातील लोकांनी लोकशाही पध्दतीने निवडून दिलेल्या परिषदेकडून स्थानिक कारभारांचे व सेवांचे व्यवस्थापन व प्रशासक करणे होय."

ब्रिटीनिका ज्ञानकोश च्या मते," स्थानिक शासन म्हणजे एकूण राज्याऐवजी अंतर्गत दृष्टया लहान भूभागात व्यवस्थापन करुन, निर्णय घेऊन त्यांची कार्यवाही करणारी सत्ता होय."

थोडक्यात वरील विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या पाहिल्यानंतर आपणांस असे म्हणता येईल की, स्थानिक स्वराज्य संस्था ही स्थानिक अशा अपेक्षानुरुप चालणारी, स्थानिक समस्यांची सोडवणूक करणारी दैनंदिन कार्याच्या स्वरुपात स्वायत्त असणारी, परंतु केंद्र किंवा राज्यांच्या आधिन राहुन कार्य करणारी स्थानिक प्रतिनिधीत्वाची सुसूत्र व्यवस्था मानली जाते. डॉ.एन.आर.इनामदार यांच्यामते स्थानिक स्वराज्य संस्थांचे सैध्दांतिक अस्तित्व खालील तीन घटकांवर अवलंबून असते यामध्ये १. अधिकारांचे विकेंद्रिकरण २. सत्तेचे विकेंद्रिकरण ३. निर्णय प्रक्रियेतील स्थानिक जनतेचे सहभागीत्व थोडक्यात एक आदर्श स्थानिक स्वराज्य संस्था तेव्हांच निर्माण होवु शकते जेव्हा प्रशासकीय दृष्टिकोनातून अधिकार विकेंद्रित असतील राजकीय दृष्टिकोनातून सत्ता विकेंद्रित असेल व अशा सत्तेत निर्णय घेण्याचे व धोरण आखण्याचे अधिकार स्थानिक जनतेला आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातुन प्राप्त झालेले असतील.

**ग्रामीण विकास : संकल्पना व अर्थ :-**

ग्रामिण विकासाच्या व्याख्या विविध अभ्यासकांनी खालील प्रमाणे केल्याचे दिसून येते.

डॉ.व्ही.के. आर.व्ही.राव यांच्या मते, "ग्रामीण क्षेत्रातील जीवनमानात सुधारणा करण्यासाठी तेथील नैसिर्गिक व मानवी संसाधनांचा पर्याप्त वापर करणे म्हणजे ग्रामीण विकास होय."

जागतिक बँकेच्या अहवालानुसार, "ग्रामीण गरिबांच्या विशिष्ट गटाच्या सामाजिक व आर्थिक जीवनमानात सुधारणा करण्यासाठी तयार केलेली व्यवहार रचना म्हणजे ग्रामीण विकास होय."

भारतीय नियोजन आयोगाच्या मते, "ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात सुधारणा घडवून आणली जाते. तिला ग्रामीण विकास म्हणता येईल."

पार्थसारथी यांच्या मते, "ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील निर्धनांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी करण्यात आलेला प्रयत्न होय."

वरील व्याख्या वरुन ग्रामीण विकास ही संकल्पना स्पष्ट होते. थोडक्यात ग्रामीण विकास म्हणजे लोकसहभागातुन ग्रामीण क्षेत्रातील नैसर्गिक व मानवी संसाधनांचे संवर्धन विकास व कार्यक्रमाचा वापर करुन तेथील जनतेच्या जीवनमानात आर्थिक, सामाजिक, राजकीय व संस्कृतिक बदल घडवून आणणे होय. बदल घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

**ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थेची भूमिका :-**

ग्रामीण भागाच्या विकासाची महत्वाची जबाबदारी पंचायतराज संस्थेच्या माध्यमातून पार पाडली जाते. केंद्र व राज्य शासन ग्रामीण विकासासाठी जे काही धोरणे, योजना, कार्यक्रम ठरवते. त्या सर्वांच्या अंमलबजावणीचे कार्य पंचायतराज संस्थेस पार पाडावे लागते. म्हणून पंचायतराज व्यवस्था ग्रामीण विकासाच्या योजना आणि कार्यक्रम किती कार्यक्षमपणे आणि पारदर्शकपणे राबविते व त्याची अंमलबजावणी करते यावरच ग्रामीण विकास करण्यासाठी ७३ वी घटना दुरुस्ती करुन ११ वे परिशिष्ट संविधानामध्ये समाविष्ट करण्यात आले व या परिशिष्टामध्ये २९ विषयांची यादी देण्यात आलेली आहे. हे २९ विषयांचे कार्य पंचायतराजला अनिवार्य आहेत. या २९ विषयांच्या कार्यानुतच ग्रामीण विकासात पंचायत राजची भूमिका किंवा योगदान स्पष्ट होते. खालील प्रमाणे आपणांस थोडक्यात आढावा घेता येईल.

**१. कृषी विकासातील भूमिका :-**

ग्रामीण भागाचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे पंचायतराज मार्फत कृषी विकासाच्या विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात. उदा. शेतकऱ्यांना शेती साहित्याचे वाटप खते व बियाणे वाटप, औषधी वाटप, कृषी प्रशिक्षण व कार्यक्रमांचे आयोजन इ. या योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी

पंचायत व्यवस्थेत स्वंतत्र कृषी विभाग कार्यरत असतो. थोडक्यात कृषी अधिकारी विविध योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी करत ग्रामीण भागांचा विकास साधण्याचा सतत प्रयत्न करत असतात.

**२. पशुसंवर्धन व दुग्धविकासाची भूमिका :-**

ग्रामीण भागात कृषी व्यवसायाला साहया, असा पशु-संवर्धन व दुग्ध व्यवसाय केला जातो. यासाठी शेतकरी कडून गाय, बैल, म्हैस, शेळया, मेंढया आणि कोंबडया इ. जनावरे पाळली जातात. यांचे संवर्धन करण्यासाठी पंचायतराज मार्फत अनेक योजना कार्यक्रम राबविले जातात. यामध्ये प्रामुख्याने जनावरांचे दवाखाणे चालविणे, मोफत औषधोपचार करणे, सुधारित पैदाशिच्या जनावरांचे वितरण करणे, गुजरांचे प्रदर्शन व मेळावे भरविणे, गुरांना चाऱ्याची व्यवस्था करणे. दुग्धविकासाला चालना देणे. इ. थोडक्यात स्थानिक संस्थाद्वारे पशुसंवर्धन व दुग्ध विकासात महत्वाचे योगदान दिले जाते.

**३. वने (जंगल व गायरान जमिन) विषयक भूमिका :-**

गावाच्या क्षेत्रात असलेली गायरान जमिन व जंगल संर्वधन होण्यासाठी पंचायतराज संस्थेमार्फत विशेष प्रयत्न केले जातात. गायरान जमीन जनावरांच्या चारा मिळविण्यासाठी व चारण्यासाठी एटकन ठेवली जाते. जंगले व पडीक जमिन पाणलोट क्षेत्राचा विकास करुन पाणी आडविले जाते. जमिनीची धुप होवू नये म्हणून वृक्षारोपण केले जाते. इ.कार्यातुन या संस्थांची वनविषयक भूमिका स्पष्ट होते.

**४. शिक्षणविषयक भूमिका :-**

ग्रामीण भागात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था पंचायतराज मार्फत केली जाते. ग्रामीण भागातील प्रत्येक भागात जिल्हा परिषदेच्या शाळा स्थापन केल्या आहेत. या शाळेचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण, नियंत्रण, शैक्षणिक साहित्याचा पुरवठा आणि शिक्षकांच्या निवडीपासून त्यांच्या व्यवस्थापनाचे सर्व कार्य जिल्हा परिषदेमार्फत पंचायतराज व्यवस्थेलाच करावे लागते.

**५. स्वच्छतेविषयक भूमिका :-**

गावाच्या स्वच्छतेसाठी पंचायतराजच्या माध्यमातुन अनेक कार्यक्रम राबविले जातात. यामध्ये संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, निर्मल ग्रामस्वच्छता अभियान हगणदारीमुक्त अभियान इ. अभियानाच्या माध्यमातुन पंचायतराज ग्रामीण स्वच्छतेचे कार्य करीत असते.

**६. राजकीय भूमिका :-**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात नेतृत्व उदयास येत आहे.समाजातल्या सर्व स्तरांना आरक्षणाच्या माध्यमातून सहभागी करुन घेतले जाते. त्यामुळे या संस्थाच्या माध्यमातून सहभागी करुन घेतले जाते. त्यामुळे या संस्थांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात राजकीय जागृती होवून नवीन नेतृत्व निर्माण होण्यास मदत होत आहे. व हेच ग्रामीण नेतृत्व केंद्रात महत्वाच्या पदावर कार्य करतांना दिसत आहे. पंचायतराज व्यवस्थेकडे हे सर्व शक्य झाले आहे.

**७. सार्वजनिक रस्ते व दिवाबत्तीविषयक भूमिका :-**

ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते व दिवाबत्तीची व्यवस्था करण्याचे कार्य पंचायतराज सुटयाद्वारे संस्थाद्वारे केले जाते. करांच्या माध्यमातुन जी रक्कत जमा होते ती रक्कम रस्ते व दिवाबत्तीसाठी काही प्रमाणात खर्च केली जाते. तसेच राज्यशासन व वित्त आयोगाच्या माध्यमातून विधी उपलब्ध करुन दिला जातो.

**८. स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवठा विषयक भूमिक :-**

ग्रामिण भागात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची महत्वाची जबाबदारी पंचायतराज संस्थेची असते. नळयोजना, विहिर, हातपंप याद्वारे पाणीपुरवठा केला जातो. तसेच पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो व ही जबाबदारी पंचायतराज व्यवस्थेला पार पाडावी लागते.

**९. आरोग्य विषयक भूमिका :-**

ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही महत्वाची जबाबदार पंचायतराज व्यवस्थेला पार पाडावी लागते. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करुन याद्वारे विविध आरोग्य विषयक सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था पंचायतराज संस्थाच्या माध्यमातून दिली जाते.

**१०. समाजकल्याण विषयक भूमिका :-**

पंचायतराज मार्फत अनेक समाज कल्याण योजना राबविल्या जातात. उदा. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वस्तीगृहे, गरिबांना लघुउद्योगासाठी वित्त साहाय्य, अस्पृश्यता निवारण कार्यक्रम, प्रशिक्षण इ.विविध माध्यमातून पंचायतराज व्यवस्था समाज कल्याणविषयक कार्य पार पाडतांना दिसून येते.

**११. प्रशिक्षण व विस्तारविषयक भूमिका :-**

पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अधिक कार्यक्षमपणे हया संस्था चालवू शकतात. हे सिध्द करुन दिले ग्रामीण भागाचा कायापालट करण्यामध्ये या संस्थाची भूमिका महत्वाची आहे. गांधीनी सांगीतल्याप्रमाणे खरा भारत खेडयात आहे. त्यांचे स्वप्न साकार करण्यामध्ये व त्यास मुर्तरुप देण्यामध्ये या संस्थामध्ये भूमिका महत्वाची असल्याचे आपणांस सांगता येईल.

**संदर्भसुची**

१. पंचायतराज संकल्पना और वर्तमान स्वरुपा : विजय रंजन दत्त.
२. स्थानिक स्वराज्य संस्था : प्रा.गोविंद यमलवाड
३. पंचायतीराज आणि नागरी प्रशासन : डॉ.शिरसाठ व डॉ.भगवानसिंग बैनाडे, ऑगस्ट २०१४
४. पंचायतराज व ग्रामीण विकास - प्रा.जे.बी.नाडे, ऑगस्ट - २०१६
5. Ministry of Rural Development, Government of India.
6. www.rural.nic.in
७. योजना मलिक
८. लोकराज्य मासिक
9. www.wikipedia.org
१०. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था - डॉ.रमेश शंकरराव एखेळीकर